# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध योजनाच्या शिबिराचे दोन दिवसाकरिता आयोजन

मा. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी दिनांक 06 फेब्रुवारी व 7 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजता या कालावधीत विविध योजनाबाबत माहिती उपलब्ध करून देण्याकरिता मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिरात आयुष्मान योजना, आयुष्मान क्षयरोग व इतर मोहिमेची योजना, जननी सुविधा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, पी.एम. स्वनिधी, क्षयरोग टी.बी.टी. योजना, मालमत्ता कर, उतारा, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे, निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेच्या मुलामुलींना, शैक्षणिक आर्थिक मदत, मुली व महिलांसाठी कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, पुरुष कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, विधवा/निराधार महिला करिता आर्थिक मदत (माय माऊली योजना) विविध परवाने, दिव्यांग व्यक्तींकरिता साहित्य व उपकरणे पुरवठा करणे या सर्व बाबींची माहिती देण्यात येणार आहे. दिनांक 05 फेब्रुवारी 2024 रोजी मॅक्सस मॉल भाईंदर (प.), नवघर नाका, टीएमटी बस स्थानक मिरा रोड येथे व दिनांक 06 फेब्रुवारी 2024 रोजी मॅक्सस मॉल भाईंदर (प.), गोल्डन नेस्ट सर्कल, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवन काशिमिरा पोलीस स्टेशन येथे सदर शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तरी सदर शिबिरासाठी शहरातील गरजू नागरिकांनी उपस्थित राहून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन  मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.